# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र. ७२४/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक ०३/११/२०१६

**१) मोटार सायकल चालकाच्या निष्काळजीपणामुळे दोन जखमी . :–**

दिनांक ०२/१०/२०१६ रोजी ११.३० वा. दर. यातील फिर्यादी नरेश मुरलिधर ढोमने वय ४२ वर्ष, रा. मकडे नगर तुमसर हा आपल्या मोटार सायकल क्र. एमएच ३६ यु ८०६७ ने बघेडा येथे आपल्या भाच्या सोबत जात असतांनी मागेहुन यातील आरोपीने आपल्या ताब्यातील मोटार सायकल हयगयीने व निष्काळजीपने चालवुन मोटार सायकलला धडक देऊन जखमी करुन शिविगाळ केल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन गोबरवाही येथे कलम २७९,३३७,५०४ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. मोदनकर पो.स्टे. गोबरवाही हे करीत आहेत.

**२) शाळेचा ताला तोडुन आत प्रवेश करुन शाळेतील क्रिकेट किट व ओरियंट पंख्याची चोरी . :–**

दिनांक ०२/११/२०१६ रोजी १०.३० वा. दर. यातील जिल्हा परिषद शाळा वरठी येथील शाळेच्या ईमारतीमधील क्रिडा खोलीचे कोणीतरी अज्ञात चोराने ताला तोडुन आत प्रवेश करुन खोलीत ठेवलेला क्रिकेट किट कि. ३,०००/–रु. व २ नग ओरियंन्ट कंपनीचे पंखे कि. ३,०००/–रु. असा एकुण ६,०००/–रु. चा माल चोरुन नेल्याने फिर्यादी गोपाल जयराम लांजेवार वय ४३ वर्ष, रा. किसान नगर भंडारा यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन वरठी येथे कलम ३८०,४५४,४५७ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. पटले पो. स्टे. वरठी हे करीत आहेत.

**३) प्रकृती बरी नसल्याने उपचारा दरम्यान गरोदर महीलेचा मृत्यु . :–**

दिंनाक. ०१/११/२०१६ रोजी १६.४५ वा. दर. यातील मृतक सौ. प्रमीला कारु कांबळी वय २४ रा. पाथरी पु. (चिचाळ) ही ८ महीण्या पासुन गरोदर असुन तीची प्रकृती बरी नसल्याने तीला दि. ०१/११/२०१६ ला ०८.०० वा. दर. प्रकृती जास्त खराब झाल्याने तीला उपचारा करीता सा. रु. भंडारा येथे भरती केले असता उपचारा दरम्यान मरण पावल्याने डॉ. मेमो वरुन पो. स्टे. भंडारा येथे मर्ग क्र. ००/१६ क. १७४ जाफौ चे कागदपत्र प्राप्त झाल्याने सरतर्फे फिर्यादी पोहवा. कठाणे पो. स्टे. अडयाळ येथे प्राप्त झाल्याने पोस्टे. अडयाळ यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन अडयाळ येथे कलम १७४ जाफौ. अन्वये नंबरी मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. शेख पो. स्टे. अडयाळ हे करीत आहेत.

**४) मोटार सायकलल स्लीप झाल्याने जखमी इसमाचा उपचारा दरम्यान मृत्यु . :–**

दिंनाक. १६/०९/२०१६ रोजी १८.०० वा. दर. यातील मृतक चोपराम सोमाजी कडव वय ३० वर्ष, रा. मचारणा हा आपल्या मोटार सायकलने पालांदुर कडुन मचारना येथे जात असता मोटार सायकल ही स्लीप झाल्याने खाली पडुन जखमी झाल्याने त्यास उपचारा करीता मेडीकल कॉलेज नागपुर येथे भरती केले असता उपचारा दरम्यान मरण पावल्याने पोस्टे अजनी नागपुर येथे मर्ग क्र. ००/१६ क. १७४ जाफौ चे कागदपत्र टपालाने प्राप्त झाल्याने सरतर्फे फिर्यादी पोहवा. राऊत पो. स्टे. पालांदुर येथे प्राप्त झाल्याने पोस्टे. पालांदुर यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन पालांदुर येथे कलम १७४ जाफौ. अन्वये नंबरी मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास सफौ. कोल्हे पो. स्टे. पालांदुर हे करीत आहेत.

**५) अवैध दारु अडयांवर धाडी . :–**

दिनांक ०२/११/२०१६ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पो.स्टे. भंडारा, तुमसर व गोबरवाही येथील अवैध दारू अडयांवर धाडी घालुन एकुण ०५ गुन्हे दाखल करुन आरोपीतांच्या ताब्यातुन ९० लिटर हातभट्टी दारु कि. ७,२००/–रु. चा माल जप्त करण्यात आला आहे.

**६) मोटार वाहन कायद्याखाली कारवाई. :–**

दिनांक ०२/११/२०१६ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायद्याखाली ७३ प्रकरणांची नोंद कण्यात आलेली असून त्यापैकी तिन सिटर वाहनांवरती १३ केसेस व ईतर वाहनांवरती ५८ केसेस आणि अवैद्य प्रवासी ०२ केस करण्यात आलेल्या आहेत.

(बी. आर. गाडे)
**प्रभारी पोलीस उपअधिक्षक(गृह)**
**भंडारा करीता**
**दुरध्वनी.क्र. ८८०५१०११९२**

३/११/१६

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.